**क्र.का.१२/मुद्रांक परतावा/१०६४-११०३**
**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक**
**महाराट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,पुणे १.**
**दिनांक : २५/३/१९९७**

**परिपत्रक :-**

**विषय :- मुद्रांक परतावा प्रकरणांमध्ये निष्कारण होणारा विलंब टाळणेबाबत..**

या कार्यालयाचे परिपत्रक क्र. का-१२/मु.प./२१२७.५६ दि. ४/१२/९२ अन्वये परतावा प्रकरणी कार्यवाही करण्यास विलम्ब टाळणेबाबत स्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि, असे निदर्शनास आले आहे की, मुद्रांक जिल्हाधिकारी या सूचनांचे योग्य प्रकारे पालन करीत नाहीत. त्यामुळे पक्षकारास अनेकवेळा निष्कारण संबंधीत कार्यालयात हेलपाटे मारावे लागतात. विशेषतः मुंबई येथील परतावा प्रकरणे अर्ज केल्यापासून २ ते ३ वर्षे पर्यंत प्रलंबित ठेवली जातात. ५०,०००/- पेक्षा जास्त रक्कमेच्या बाबत शासनाकडे पाठविलेल्या प्रकरणी ही विलंबाची बाब शासनाचेही निदर्शनास आली आहे.

परतावा मंजूर करण्यास विलंब टाळणेसाठी परतावा अर्जासोबतच पक्षकाराकडून आवश्यक ती कागदपत्रे प्राप्त करून घ्यावीत. त्रुटी असल्यास त्याची पुर्तता १५ दिवसांचे आत करून घेण्यात यावी. या कार्यालयास पाठविण्याची प्रकरणे पूर्ण छाननी करून आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह पाठविण्यांत यावीत. त्रुटीमुळे निष्कारण पत्रव्यवहारांमध्ये कालावधी वाया जातो. आज योग्य त्या पक्षकारानेच व मुदतीत केला आहे काय हे मुखतः अर्ज प्रापत होताच पहावे.

वरील सर्व बाबी मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी कटाक्षाने लक्षात घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करावी व परतावा प्रकरणे मंजूर करण्यास शक्यता विलंब होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**का.प्र.मा.नों.म.नि.**
**यांचे सहीची असे.**

**सही /-**
**नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक**
**महाराष्ट्र राज्य, पुणे करीता.**

**प्रति,**
**१) सर्व दुय्यम निबंधक**
**२) सर्व सह जिल्हा निबंधक ( दु. नि. यांचे जादा प्रतीसह)**
**३) सर्व सक्षम अधिकारी**